पाचवा सामना

Vs

गुजरात टायटन्स वि. पंजाब किंग्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : अहमदाबाद

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ३८.९


किमान तपमान २६.७

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २५ मार्च २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १७५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# पैशावरून कडाक्याचे भांडण, दोस्त भडकला छातीत चाकू खुपसून मित्राचाच घात केला

✔ मंगळवेढा/प्रतिनिधी

**मंगळवेढा तालुक्यातील बोराळे गावात रविवारी रात्री थरार घडला. ठिबक सिंचनासाठी दिलेले पैसे मागूनही न दिल्याने दोन मित्रांमध्ये फोनवर कडाक्याचे भांडण झाले. वारंवार पैसे मागूनही तो देत नाही, याचा दुसऱ्या मित्राला राग आला. त्याने रात्री भर चौकात जावून आपल्याच मित्राच्या छातीत सत्तूरने वार करून त्याचा खून केला आणि तेथून रात्रीच पसार झाला. ही घटना रात्री साडे नऊच्या सुमारास छत्रपती चौकात घडली. महेश उदयकुमार गोवर्धन असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून आरोपी भिमराव उर्फ बाळू कृष्णा चौगुले (वय ३५ वर्षे, रा. बोराळे ता. मंगळवेढा) यास बारा तासांच्या आत सोमवारी अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.**



## ● मंगळवेढा तालुक्यातील बोराळे गावात रात्रीचा थरार
## ● केवळ १२ तासात खुन्याला जेरबंद करण्यात यश



मयत महेश गोवर्धन

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की - आरोपी भिमराव उर्फ बाळू कृष्णा चौगुले याने मध्यस्थी राहुन मयत महेश उदयकुमार गोवर्धन यास बटईने घेतलेल्या तामदर्डी येथील शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचनचे साहित्य घेवून दिले होते. त्याचे पैसे गोवर्धन याच्याकडून येणेबाकी होते.

आरोपी हा त्या पैशाची फोनवरुन मागणी करत होता. त्यावेळी त्यांच्यात फोनवर वादावादी झाली होती. त्याचा राग मनात धरुन भिमराव उर्फ बाळू चौगुले याने रविवारी रात्री साडे नऊच्या सुमारास बोराळे (ता. मंगळवेढा) येथील छत्रपती चौकात गोवर्धन याच्या छातीत चाकू सारख्या हत्याराने वार करुन, त्यास गंभीर दुखापत करुन जीवे ठार मारले. याप्रकरणी महेशचे वडील उदयकुमार दादाराव गोवर्धन व्य ६५ वर्ष व्यवसाय- मजुरी रा मठ विभाग बोराळे ता मंगळवेढा यांनी फिर्याद दिली असून त्यानुसार भिमराव चौगुले विरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

सुमारे एक वर्षापासून प्रमोद प्रभाकर स्वामीं रा पुणे यांची बोराळे हद्दीत असलेली आठ एकर शेत जमिन बटईने घेतली असून महेश हा त्यावर उदरनिर्वाह करायचा. माझा मुलगा महेश याचे गावात राहणारा बाळु चौगुले याच्याशी मैत्री असल्याने ते दोघेजण शेतात काय काम असल्यास मिळून जात येत होते.

### धमकी दिली आणि करून दाखवले

रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बाळु चौगुले हा मोटारसायकवरुन घरी आला व त्याने आम्हाला महेश कोठे गेले आहे तो मला आज भेटला नाही असे म्हणून तो परत निघून गेला त्यानंतर सायंकाळी साडेसहाच्या सुमारास परत बाळू चौगुले हा मोटारसायकल वरुन एकटाच घरी आला आम्हाला महेश घरी आला नाही का? त्याला आज सोडत नाही जिवे ठार मारतो असे म्हणून शिवीगाळ करुन निघून गेला,असे फिर्यादीत नमूद आहे. महेश हा उदयकुमार यांचा एकुलता एक मुलगा असून त्याला मूल–बाळ होणार होते.

### बारा तासात अटक

खून केल्यानंतर भिमराव हा तेथून पसार झाला. पोलिसांनी परिसरात पथके पाठवून त्याला पकडण्याची मोहीम राबवली. तो तामदर्डी परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. अवघ्या १२ तासात पोलिसांनी ही मोहीम फत्ते केली. ही कामगिरी मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर,सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे, विजय पिसे, खंडागळे, वाघमोडे, पवार, कांबळे, गेजगे, दुधाळ, देशमुख यांच्या पथकाने केली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास सपोनि अंकुश वाघमोडे हे करत आहेत.

# म.फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न बहुमान देण्याचा ठराव

✔ **मुंबई** : स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च बहुमान देण्याचा ठराव विधानसभेत सोमवारी करण्यात आला.

मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ आणि काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी या ठरावाला पाठिंबा दिला.आता राज्य सरकारच्या वतीने यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस केली जाणार आहे. समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार केंद्राने द्यावा, अशी शिफारस करणारा ठराव सोमवारी महाराष्ट्र विधानसभेने एकमताने मंजूर केला. मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ आणि काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी या ठरावाला पाठिंबा दिला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला



आहे. फडणवीस म्हणाले की, फुले यांना देण्यात आलेली महात्मा पदवी लोकांनी ओळखली आहे. ''महात्मा पदवी देशातील सर्व गोष्टींपेक्षा श्रेष्ठ होती आणि ती फक्त दोनच लोकांना मिळाली-महात्मा फुले आणि महात्मा गांधी,'' असे ते म्हणाले.

समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याचा महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेला ठराव हा लोकभावनेचा आदर करणारा आणि भारतरत्न पुरस्काराचा गौरव वाढवणारा ठराव आहे, अशा शब्दात अजित पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तू आल्याचं आश्चर्य नाही, दुःख आहे!


कल्याण
111-33-139

मुंबई
790-69-180


# मार्केट कमिटीच्या रणनीतीविषयी जिल्ह्यात उत्सुकता सोन्याची अंडी देणाऱ्या संस्थेत नवरदेवांची भाऊगर्दी

## आजपासून उमेदवारी दाखल करून घेणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी




सोलापूर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर या तालुक्यांचे राजकीय केंद्र असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती तथा मार्केट यार्डाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आज मंगळवारपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. गेल्या दीड वर्षांपासून या समितीत लोकनियुक्त सदस्य मंडळ प्रलंबित आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत राजकीय रणनीती कशी असेल, याकडे राजकीय क्षेत्राचे लक्ष लागून आहे. बाजार समितीसाठी २७ एप्रिल रोजी मतदान, तर २८ एप्रिलला मतमोजणी होणार आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सलग पाच वर्षे चेअरमन पदाचा कार्यभार सांभाळणारे माजी पालकमंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे शहर उतरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी यंदा बाजार समितीची निवडणूक लढवणार नाहीत असे सांगितले आहे.मात्र शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार मिळायला पाहिजे ही त्यांची मागणी मान्य झाल्यास ऐनवेळी ते निर्णय बदलूही शकतात.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया मंगळवार २५ मार्च २०२५ पासून सुरू होणार आहे. यंदाच्या बाजार समितीच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना मतदान नाही. सोसायटी संचालक, ग्रामपंचायत सदस्य आणि हमाल, तोलार, व्यापारी यांचे मतदान असणार आहे.सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी हा महत्वाचा घटक असून देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार दिला होता तोच अधिकार शेतकऱ्यांना पुनः देण्यात यावा अशी मागणी करणार आहे.यंदाच्या निवडणुकीत दिलेला अधिकार रद्द करून उमेदवाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेतकऱ्यांना दोन्ही संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करणार आहे,असे आ.देशमुख यांनी सांगितले.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उत्तर व दक्षिणचे प्राबल्य आहे. दक्षिणमध्ये सुरेश हासापुरे, तर उत्तरमध्ये दिलीप माने यांचे प्राबल्य आहे.मागील सत्तेत एक वर्ष माजी आमदार दिलीप माने हे सभापती होते तर उर्वरित कालावधी आ.विजयकुमार देशमुख हे सभापती होते.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती गेल्या अनेक निवडणूक वर दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूरचे प्रबल्य आहे. ट सहा महिने प्रशासकानंतर सहा वर्षानंतर निवडणूक प्रकियेस गती मिळाली आहे. सत्ता प्राप्त करण्यासाठी आजपासून रणनीती आखली जात असून काहींनी आपला पॅनल प्रमुख निवडण्यासाठी गाठींभेटीं सुरू केली आहे.यंदाच्या बाजर समिती निवडणुकमध्ये अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, काँग्रेसचे नेते सुरेश हसापुरे, माजी आमदार दिलीप माने हे बाजार समितीच्या निवडणूकमध्ये उतरणार आहेत.

### सोन्याची अंडी देणारी संस्था

आज कार्यकर्त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.सोन्याची अंडी देणारी संस्था म्हणून मार्केट कमिटीकडे पाहिले जाते.त्यामुळे निवडणुकीच्या बोहल्यावर इच्छुक नवरदेवांची भाऊगर्दी असेल,असे जाणकार सांगतात.

### सर्वपक्षीय सदस्यमंडळाची तयारी

या निवडणुकीसाठी गाठीभेटी सुरू आहेत.सहका क्षेत्र असल्याने या निवडणुकीत राजकीय पक्ष चालत नाहीत तर पॅनेलवरच निवडणूक होईल.शक्यता बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.त्यासाठी लवकरय सर्वपक्षीय बैठक घेणार असल्याचे माजी संचालक बाळासाहेब शेळके यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले

# एकनाथभाई अन् देवाभाऊंमधील नाराजीची दरी होतेय कमी

## ✔ कुणाल कामराच्या घमासानात फडणवीस हे शिंदेंच्या बाजूने ठाम
## ✔ खालच्या दर्जाच्या कॉमेडीप्रकरणी माफी मागायलाच हवी भूमिकेवर मुख्यमंत्री आग्रही

✔ मुंबई/विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्रीपदासह मंत्रिमंडळातील महत्वाच्या खात्यावरुन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली होती. परंतु अधिवेशनादरम्यान या दोघांमधील नाराजी कमी होत असल्याचे जाणवत आहे. विशेषत्वे, याची प्रचिती सोमवार (ता.२४) कुणाला कामराच्या गाण्याच्या प्रकरणावरुन राजधानी मुंबईसह राज्यभरात जे घमासान सुरु झालं आहे, या अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर मुख्यमंत्री फडणवीसांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याची भूमिका घेत शिंदे यांच्यावर कविता करुन खळबळ माजवून देणाऱ्या कुणाल कामराने याप्रकरणी माफी मागितलीच पाहिजे, असे ठणकावून सांगितले.**

### शिंदे अन् फडणवीसांच्या 'दिलसे' मनोमिलनातून 'हे' उमटतील प्रभावी सकारात्मक परिणाम

● एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात दुरावा आल्याने कार्यकर्त्यांची कामे थांबली होती. पण आता दोघं एकत्र येत असल्याने कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

● २०२४ विधानसभा निवडणूक लागण्याअगोदर एकनाथ शिंदे सरकारने बऱ्याच भाजपाने शिवसेना कार्यकर्त्यांना महामंडळे दिली होती. तीही आता देण्यात येतील, अशी चर्चा आहे.



उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री निवड आणि मंत्रिमंडळ विस्तार या टप्प्यावर फडणवीस आणि शिंदे यांच्यामध्ये केवळ मतभेदच नव्हे, तर मनभेदसुद्धा निर्माण झाल्याचं अनेक आघाड्यांवर तसेच कित्येक प्रसंगातून दिसून आलेले होतं. मात्र अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान फडणवीस आणि शिंदे या उभतांमध्ये एकमेकांबद्दल पुन्हा बॉडिंग होत असल्याचे स्पष्टपणे दिसू लागले आहे.

२०२४ ला विधानसभेला महाराष्ट्रामध्ये सत्ता आल्यानंतर भाजपवाले पुन्हा आपल्याला मुख्यमंत्री करतील अशी आशा एकनाथ शिंदेंना होती. परंतु, संख्याबळामुळे भाजपचे देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. सुरुवातीला एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री होण्यास तयार नव्हते. या टप्प्यावर एकनाथ शिंदे बराच काळ नाराज होते. राज्याच्या बऱ्याच बैठकांना एकनाथ शिंदे यांनी दांडी मारून कधी आजारी असल्याचे सांगून तर कधी फोन बंद करून गावाकडे गेल्याच्या बातम्या समोर आल्या. एका भाषणात एकनाथ शिंदेंनी मला हलक्यात घेऊ नका अशी धमकीही देऊन टाकली. त्यामुळे बराच काळ शिंदे आणि फडणवीस मध्ये दुरावा दिसून आला. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विरोधकांनी औरंगजेबाची उपमा दिली त्यावेळी लगेच एकनाथ शिंदे फडणवीस यांच्या मदतीला धावून आले आणि त्यांनी विरोधकांवर कडाडून 'प्रहार' केला. तसेच एकनाथ शिंदे यांच्यावर कामराने व्यंग गाणे केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाठीमागे न राहता कामरायाने लगेचच एकनाथ शिंदे यांची माफी मागावी अशी मागणी केली. एकमेकांच्या मदतीला धावून आल्याने फडणीस आणि शिंदे यांच्यातील दरी कमी होऊ लागल्याचे अधिवेशनादरम्यान जाणवत आहे.

### शिंदेंच्या बाजूने उभे राहणारे

### मुख्यमंत्री फडणवीस स्पष्टच म्हणाले, माफीच मागायला हवी!

स्वातंत्र्याचा स्वैराचार करण्याचा अधिकार कुणालाही नाहीये. महाराष्ट्राच्या जनतेने २०२४ साली कोण गद्दार आणि कोण खुद्दार, हे दाखवून दिलं आहे. हिंदु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसदार कोण आहे, हे जनतेने ठरवलेले आहे. त्यामुळे अशा प्रकारे खालच्या दर्जाची कॉमेडी करणं चूक आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री आणि ज्यांच्याबद्दल राज्यातल्या जनतेला आदर आहे, त्यांचा अनादर करण्याचा कोणालाही अधिकार नाही. तुम्ही कॉमेडी करा, व्यंग करा पण जर अपमानीत करण्याचं काम कुणी करेल, हे सहन करणार नाही. कामरा यांनी माफी मागितली पाहिजे. त्यांनी जर संविधान वाचलं असेल किंवा त्यांना संविधानाची माहिती असेल तर संविधानानेच सांगितलं आहे की, स्वातंत्र्याचा स्वैराचार करता येणार नाही. दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी माफी मागितली पाहिजे. असं फडणवीस यांनी सांगितलं.